# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः06.07.2025 वारःरविवार

---

•आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची महापूजा; पंढरपुरात वैष्णवांची मांदियाळी

•बळीराजाला सुखी समाधानी ठेव, राज्यावरचं संकट दूर कर मुख्यमंत्र्यांचं विठ्ठल चरणी साकडं

•मराठीच्या मुद्द्यावर राज्यातल्या सर्व नागरिकांनी पक्षीय मतभेद दूर करून एकत्र येण्याचं राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचं आवाहन

•ज्येष्ठ शिक्षणतज्ञ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉक्टर शं ना नवलगुंदकर यांचं निधन

आणि

•अँडरसन - तेंडूलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारताचं इंग्लंडसमोर विजयासाठी ६०८ धावांचं लक्ष्य

**<u>आषाढी</u>**

पांडुरंगाने राज्यावरची संकट दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरता आशीर्वाद द्यावा, असं साकडं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विठ्ठलाला घातलं. आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर इथं आज पहाटे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली; यंदाचे मानाचे वारकरी कैलास उगले आणि कल्पना उगले यांनीही त्यांच्यासमवेत विठ्ठलाची महापूजा केली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला;

त्यावेळी फडणवीस बोलत होते. आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले

**<u>बाईट – मुख्यमंत्री</u>**

आषाढी एकादशीसाठी पंढरपुरात मोठ्या प्रमाणावर विठ्ठल भक्त दाखल झाले आहेत. त्यांच्या सोयीसाठी पंढरपूर पालिकेनं जय्यत तयारी केली आहे. प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पंढरपुरात नगर प्रदक्षिणा मार्ग, नामदेव पायरी, विठ्ठल मंदिर परिसर गर्दीनं फुलून गेला आहे. मंदिराला  फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे.

**<u>मुख्यमंत्री</u>**

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल पंढरपूरमध्ये विविध उपक्रमांचं उद्घाटन झालं. आषाढी वारीनिमित्त राबवल्या जाणाऱ्या निर्मल दिंडी, आरोग्य वारी आणि 'पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी' या उपक्रमांचा समारोप मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. वारकऱ्यांची सेवा करणाऱ्या ग्रामसेवक आणि आरोग्यसेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांचं त्यांनी कौतुक केलं. निर्मलवारीमुळे महिला वारकऱ्यांची संख्या वाढली असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. पर्यावरण वारीच्या माध्यमातून  विठ्ठल भक्तांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश गावोगावी घेऊन जावा असं आवाहनही फडणवीस यांनी केलं.

पंढरपूर इथं आयोजित कृषी प्रदर्शनाचं उद्घाटनही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं. या प्रदर्शनातून नवीन शेती पद्धती, तंत्रज्ञान आणि ते उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत असल्याचं ते म्हणाले. दरवर्षी ५ हजार याप्रमाणे ५ वर्षात २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक कृषी क्षेत्रात केली जाणार आहे. शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज देण्यासाठी सौर ऊर्जेवर विद्युत निर्मिती सुरू असून यात सोलापूर जिल्हा अग्रेसर असल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं.

**<u>गवई</u>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं व्यक्तिमत्त्व विधिज्ञ, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ असे बहुआयामी होते; शिक्षण क्षेत्रातील बहुमोल योगदानाबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अध्यापन कारकीर्दही मोलाची आणि प्रेरणादायी आहे, असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्राध्यापक आणि प्राचार्य, कारकीर्दीला 90 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मुंबईमध्ये शासकीय विधी महाविद्यालय इथं स्मृतीपटलाचं  अनावरण आणि सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या सत्कार समारंभाचं आयोजन करण्यात आलं होतं; त्यावेळी ते बोलत होते. डॉ. आंबेडकर यांनी ज्या महाविद्यालयात अध्यापनाचं कार्य केलं; त्या ठिकाणी गौरव होणं आनंददायी आहे; तसंच शासकीय विधि महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्याचा सार्थ अभिमान असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

**<u>ठाकरे मेळावा</u>**

मराठीच्या मुद्द्यावर राज्यातल्या सर्व नागरिकांनी पक्षीय मतभेद दूर करुन एकत्र यावं असं आवाहन मनसे प्रमुख राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलं. मुंबईत वरळीत झालेल्या विजयी मेळाव्यात ते काल बोलत होते. भाषेचा अभिमान बाळगण्यासाठी कुठल्या भाषेत शिक्षण घेतलं हे महत्त्वाचं नाही; असं सांगून भाषेच्या मुद्द्यावरुन मारहाण न करण्याचा सल्ला राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना दिला. मराठी भाषा, मराठी माणूस या मुद्द्यावर तडजोड होणार नाही, हे स्पष्ट केलं.

संकटात मराठी माणून एकत्र येतो आणि संकट गेल्यावर एकमेकांशी भांडतो, या पुढे अशा डावांना बळी पडू नका, सर्व पक्षातल्या मराठी माणसांनी एकत्र यावं असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी यावेळी केलं. आम्ही कुठल्याही भाषेच्या विरोधात नाही मात्र सक्तीच्या विरोधात आहेत. त्यामुळं कोणावर दादागिरी करणार नाही पण दादागिरी केली तर ती सहन करणार नाही, असा इशारा सुद्धा त्यांनी दिला.

या विजयी मेळाव्यात आनंदापेक्षा शल्य दिसून आल्याची टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. ते काल पंढरपूर इथं पत्रकारांशी बोलत होते. गेली 30 वर्षे मुंबई महानगरपालिका आपल्याकडे असून आपण काहीही न करता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत अनेक विकास कामे झाली असून त्याची असूया या भाषणात दिसून आल्याचंही फडणवीस यांनी म्हटलं. आपल्यालाही मराठीचा अभिमान असून मराठी बरोबरच आम्ही हिंदू असून हिंदुत्व सर्वांना बरोबर घेवून चालणारं असतं असंही त्यांनी सांगितलं.

मराठीचा नाही तर स्वार्थाचा झेंडा आणि सत्तेचा अजेंडा बोलून दाखवला, अशी टीका शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

**<u>सन्मान</u>**

तीन महिन्याचं धान्य १०० टक्के शिधापत्रिकाधारकांपर्यंत पोहोचवणाऱ्या अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील रास्त भाव दुकानदारांचा तहसीलदारांच्या हस्ते सन्मान करण्यात आला आहे. शासनाने यंदा तीन महिन्याचे एकत्रित धान्य वितरण करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. हे उद्दिष्ट अनुकूल नियोजन आणि अंमलबजावणीमुळे शक्य झालं असल्याचं निरीक्षण अधिकारी आनंद गुप्ता यांनी सांगितलं.

**निधन**

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉक्टर शं ना नवलगुंदकर यांचं काल पुण्यात निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी पुण्यात वैकुंठ स्मशानभूमीत अन्त्यसंस्कार करण्यात येणार आहेत. पुण्यातील शाहू महाविद्यालय, गरवारे महाविद्यालय, मॉडर्न महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठात त्यांनी अध्यापन केलं. २०१६पासून नवलगुंदकर संगमनेरच्या शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे विचार या विषयावर त्यांनी पीएच.डी.ची पदवी मिळवली.

विद्यार्थी हित केंद्र स्थानी ठेऊन नवलगुंदकर यांनी विद्यापीठात अधिकार मंडळ, अभ्यास मंडळ, अधिसभा, व्यवस्थापन परिषद यात निवृत्तीपर्यंत काम केलं.

**निधन**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री अशोकराव पाटील डोणगांवकर यांचं काल दीर्घ आजाराने निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज सकाळी 11 वाजता त्यांच्या डोणगांव या मूळगावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. डोणगांवचे सरपंच ते  गंगापुर-खुलताबाद मतदारसंघातून आमदार आणि पुढे त्यांनी मंत्रीपद सांभाळले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अशोकराव पाटील डोणगांवकर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**क्रिकेट**

इंग्लंडमधल्या बर्मिंगहॅम इथं सुरू असलेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेच्या दुसऱ्या सामन्याच्या कालच्या चौथ्या दिवशी भारताने कर्णधार शुभमन गिलच्या दीड शतकाच्या आणि ऋषभ पंत तसंच रविंद्र जडेजाच्या तडाखेबंद अर्धशतकाच्या जोरावर  6 बाद 427 धावांवर आपला दुसरा डाव घोषित केला. पहिल्या डावातील 180 धावांच्या आघाडीच्या पाठबळावर भारताने  इंग्लंडसमोर विजयासाठी 608 धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. काल दिवसअखेर इंग्लडच्या 3 बाद 72 धावा झाल्या होत्या. विजयासाठी भारताला 7 बळी मिळवणे आवश्यक आहे. आकाशदीपने दोन तर मोहम्मद सिराजने 1 गडी बाद केला.

**पाऊस**

पालघर जिल्ह्यात काल जोरदार पाऊस बरसत झाला. तर अकोल्यातदेखील दमदार पाऊस झाला. रत्नागिरीत देखील काल अधूनमधून पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या.  नाशिक शहरासह जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून बहुतांशी भागांमध्ये वाहतूक कोंडी झाली होती.

**<u>हवामान</u>**

येत्या २४ तासात राज्याच्या सर्वच विभागात पावसाची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.